**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११०१८**
**मा.इ प्रभाग समिती**
**कार्यपत्रिका क्रमांक - ६**
**सभावृत्तांत**

**दिनांक - ०७/०९/२०१८** **वेळ -सकाळी ११. ०० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची मासिक सभा शुक्रवार **दिनांक - ०७/०९/२०१८** रोजी **सकाळी ११. ०० वा.** इ प्रभाग कार्यालयाचे **"संत ज्ञानेश्वर महाराज"** सभागृहामध्ये आयोजीत करणेत आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१) मा.श्रीम.बारसे प्रियांका प्रविण **-** **अध्यक्षा**

२) मा.तापकीर विनया प्रदिप (आबा)

३) मा.साधना सचिन तापकीर – स्विकृत सदस्या

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

मा.श्री.श्रीनिवास दांगट - क्षेत्रीय अधिकारी, श्री.निकम मोहन-लेखाधिकारी तथा प्र.प्रशासन अधिकारी, श्री.जीवन गायकवाड-कार्यकारी अभियंता (स्थापत्य), मा.प्रविण घोडे-कार्यकारी अभियंता (विद्युत),मा.पवार- कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा), श्री.डी.डी.गवळी-उपअभियंता (जलनि:सारण), श्री.वहीकर एस.एस.प्र.उपअभियंता (पाणीपुरवठा) श्री.साळी संजय द.(उपअभियंता बीआरटीएस), श्री.अ.व.गुमास्ते - प्र.मुख्य आरोग्य निरीक्षक, श्री.डामसे आर.पी.मलेरिया निरीक्षक, श्री.क्षीरसागर आर.व्ही.-क.अभियंता (श्री.पवार वैभव –क.अभियंता (विद्युत), श्री.शितोळे एस.बी. क.अभियंता (ज.नि.), श्री.ठोकळे संदीप.- क.अभियंता (ज.नि.),श्री.निखील फेंडर-क.अभियंता (स्थापत्य उद्यान) श्री.कोंढरे एस.आर.- कार्या.अधिक्षक (अतिक्रमण क व इ), श्री.लांडगे एस.एन.मुख्यलिपिक (अतिकमण), श्री.कार्ले बी.के.-मुख्य लिपिक, श्री.साळुंके जे.जे.- मुख्याध्यापक माध्य. विद्यालय, भोसरी, श्री.गायकवाड पी.आर.मुख्याध्यापक, माध्यमिक विद्यालय लांडेवाडी,

-------

**मा.अध्यक्षा -** सर्व सन्मा.सदस्य व अधिकारी यांचे स्वागत करुन सभेला सुरवात करणेत येत आहे.

------

खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली.

सुचक- मा. प्रियांका बारसे अनुमोदक- मा. साधना तापकीर

**मा.सभापती –** तामिळनाडूचे मुख्यमंत्री करुणानिधी यांचे नुकतेच दु:खद निधनामुळे इ प्रभाग समितीच्या वतीने सर्वानी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करावी.

(सर्वानी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली)
सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

**मा.सभापती -** आज दिनांक ०७/०९/२०१८ रोजीची सभा सोमवार दिनांक ५/१०/२०१८ सकाळी ११.०० वा.होईल.

सही/-
अध्यक्षा
प्रियांका बारसे
इ प्रभाग समिती
भोसरी – ३९

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११०१८**
**मा.इ प्रभाग समिती**
**कार्यपत्रिका क्रमांक - ७**
**सभावृत्तांत**
**(दिनांक - ०७/०९/२०१८ रोजीची तहकुब सभा)**

**दिनांक - ०५/१०/२०१८** **वेळ -सकाळी ११. ०० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची शुक्रवार **दिनांक ०७/०९/२०१८** रोजी **सकाळी ११. ०० वा. ची** तहकूब सभा **दिनांक ०५/१०/२०१८** रोजी **सकाळी ११. ०० वा.** इ प्रभाग कार्यालयाचे **"संत ज्ञानेश्वर महाराज"** सभागृहामध्ये आयोजीत करणेत आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

**१) मा.भिमाबाई पोपट फुगे – अध्यक्षा**
२) मा.तापकीर विनया प्रदिप (आबा)
३) मा.डोळस विकास हरिश्चंद्र
४) मा.उंडे लक्ष्मण धोंडू
५) मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते
६) मा.गायकवाड निर्मला मनोज
७) मा.बारसे प्रियांका प्रविण
८) मा.तापकीर साधना सचिन - स्विकृत सदस्य

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

मा.श्री.श्रीनिवास दांगट - क्षेत्रीय अधिकारी, श्री.निकम मोहन-लेखाधिकारी तथा प्र.प्रशासन अधिकारी, मा.प्रविण घोडे-कार्यकारी अभियंता (विद्युत), मा.पवार - कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा), श्री.डी.डी.गवळी-उपअभियंता (जलनि:सारण), श्रीम.प्रेरणा शिनकर - उपअभियंता स्थापत्य, श्री.बी.पी.लांडे उपअभियंता (विद्युत). श्री.संदेश खडतरे उपअभियंता- नगररचना, श्री.कातोरे पी.बी. क.अभियंता विद्युत, श्री.रोडे सुनिल कल्याण – असि.इंजिनिअर, श्री.कवडे- Addl.Ex.Engg.M.S.E.D.C.L. श्री.प्रभाकर तावरे - सहा. आरोग्य अधिकारी, श्री.व्ही.एम.ताकवले- क.अभियंता-स्थापत्य, श्री.कोतकर पी.बी.-क.अभियंता (पाणीपुरवठा), श्री.बेळगांवकर सुनिल एस.-क.अभियंता (पाणीपुरवठा), श्रीम.वृषाली पोतदार-क.अभियंता, श्री.शितोळे एस.बी. क.अभियंता (ज.नि.), श्री.संदिप ठोकळे - क.अभियंता (ज.नि.), श्री.शेलार ए.बी.- क.अभियंता (ज.नि.), श्री.निखील फेंडर – क.अभियंता-स्थापत्य उद्यान, श्री.म्हेत्रे एच.जे.- उद्यान सहाय्यक, श्री.डी.डी.सटाणे उद्यान सहाय्यक, (उद्यान), श्री.सुरेश कोंढरे एस.आर.- कार्या.अधिक्षक (अतिक्रमण क व इ), श्री.लांडगे एस.एन.मुख्यलिपिक (अतिकमण), श्री.फुगे एन.जे. प्र.क्रीडा पर्यवेक्षक, श्री.गायकवाड पी.आर.-मुख्याध्यापक मा.वि.लांडेवाडी, श्री.साळुंके जे.जे.- मुख्याध्यापक माध्य. विद्यालय, भोसरी.

-------

**मा.अध्यक्षा** - सर्व सन्मा.सदस्य व अधिकारी यांचे स्वागत करुन सभेला सुरवात करणेत येत आहे.

------

खालीलप्रमाणे सूचना मांडणेत आली.

-------

सुचक- मा. विकास डोळस अनुमोदक- मा. लक्ष्मण उंडे

**मा.सभापती** – इ क्षेत्रीय कार्यालयाचे कै.जीवन गायकवाड कार्यकारी अभियंता,स्थापत्य) यांचे अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले. इ प्रभाग समिती व सर्व कर्मचारीवृंदांचे वतीने सर्वानी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण करावी.

(सर्वानी दोन मिनीटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली)

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

**मा.सभापती** - आज दिनांक ०५/१०/२०१८ रोजीची सभा सोमवार दिनांक ८/१०/२०१८.रोजी सकाळी ११.०० वा.होईल

**सही/-**

अध्यक्षा
इ प्रभाग समिती
भोसरी – ३९.

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११०१८**
**मा.इ प्रभाग समिती**
**कार्यपत्रिका क्रमांक - ६**
**सभावृत्तांत**
**(दिनांक – ०७/०९/२०१८ व दि.०५/१०/२०१८ रोजीची तहकुब सभा)**

**दिनांक - ०८/१०/२०१८** **वेळ -सकाळी ११. ०० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इ प्रभाग समितीची शुक्रवार **दिनांक ०७/०९/२०१८** रोजी **सकाळी ११. ०० वा. ची** तहकूब सभा व **दिनांक ०५/१०/२०१८** रोजी **सकाळी ११.०० वा. ची** तहकूब सभा **दिनांक ०८/१०/२०१८ वेळ- सकाळी ११.०० वा.** इ प्रभाग कार्यालयाचे **"संत ज्ञानेश्वर महाराज"** सभागृहामध्ये आयोजीत करणेत आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१) मा.भिमाबाई पोपट फुगे – अध्यक्षा
२) मा.डोळस विकास हरिश्चंद्र
३) मा.घुले नानी उर्फ हिराबाई गोवर्धन
४) मा.गायकवाड निर्मला मनोज
५) मा.सागर बाळासाहेब गवळी
६) मा.श्रीम.बारसे प्रियांका प्रविण -
७) मा.Adv.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.
मा.श्री.श्रीनिवास दांगट - क्षेत्रीय अधिकारी, मा.प्रविण घोडे-कार्यकारी अभियंता (विद्युत),मा.पवार - कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा), श्री.वहिकर एस.एस.-उपअभियंता (पाणीपुरवठा), श्रीम.प्रेरणा शिनकर - उपअभियंता स्थापत्य, श्री.डी.डी.गवळी-उपअभियंता (जलनि:सारण), श्री.व्ही.के. जाधव- उपअभियंता-स्थापत्य उद्यान, श्री.प्रभाकर तावरे - सहा.आरोग्य अधिकारी, श्री.एस.पी.घाटे- आरोग्य निरीक्षक, श्री.आर.साबळे – आरोग्य निरीक्षक, , श्री.डामसे आर.पी.मलेरिया निरीक्षक, श्री.गनबोटे ए.पी.-क.अभियंता –स्थापत्य, श्री.व्ही.एम.ताकवले- क.अभियंता-स्थापत्य, श्रीम.वृषाली पोतदार-क.अभियंता, श्री.कोतकर पी.बी.-क.अभियंता (पाणीपुरवठा श्री.संदीप ठोकळे - क.अभियंता (ज.नि.), श्री, श्री.निखील फेंडर – क.अभियंता-स्थापत्य उद्यान, , श्री.म्हेत्रे एच.जे.- उद्यान सहाय्यक, श्री.डी.डी.सटाणे उद्यान सहाय्यक, (उद्यान) (झोनिपू),श्री.फुगे एन.जे. प्र.क्रीडा पर्यवेक्षक,

-------

**मा.अध्यक्षा** - सर्व सन्मा.सदस्य व अधिकारी यांचे स्वागत करुन सभेला सुरवात करणेत येत आहे.

-----

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभाकामकाजात दाखल करुन घेणेत आले.**

------

**विषय क्रमांक** १.कै. सदाशिव फुगे मैदान (आखाडा दुरुस्ती) मा.भिमाताई फुगे, सभापती, इ प्रभाग यांचे दिनांक ८/१०/२०१८ चे पत्र.

**विषय क्रमांक** २.छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा बसविणे व परिसर सुशोभिकरण करणेबाबत.सौ.हिराबाई (नानी)गोवर्धन घुले यांचे दिनांक ८/१०/२०१८ चे पत्र.

**विषय क्रमांक** ३. मोडकळीस आलेली व अनेक वर्षापासून वापरात नसलेले मुतारी व शौचालय निष्कसित करणेबाबत. मा.विकास हरिश्चंद्र डोळस यांचे दि.८/१०/२०१८ चे पत्र.

-------

अ) दिनांक ०३/०८/२०१८ रोजी झालेल्या सभेचा (कार्यक्रमपत्रिका ५ )
सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

------

ठराव क्रमांक - १४ विषय क्रमांक- १

दिनांक- - ०८/१०/२०१८

सूचक- मा.सौ.प्रियांका बारसे अनुमोदक – मा.विकास डोळस

संदर्भ - कलम २०५ नुसार २४ मी.रुंदीचा किंवा रस्त्याच्या लांबीनुसार आवश्यक रुंदीचा रस्ता उपलब्ध करुन देणेबाबत. .भिमाताई फुगे, सभापती इ प्रभाग यांचे दिनांक० ७/०९/२०१८ चे पत्र.

मौजे च-होली बु. येथील स.न.१९८ पै., स.न.२०७ पै., स.न. १५०पै. स.न.१४५पै. हे सर्व्हे नं.९० मी. व २४ मी.विकास योजनेतील रस्त्यांच्या मध्ये असुन सदर सर्व्हे नंबर हे लॅण्डलॉक होत असलेले सदर सर्व्हे नंबरला पोहोच रस्ता उपलब्ध होणे गरजेचे आहे तरी सदर ठिकाणी कलम २०५ नुसार २४ मी. रुंदीचा किंवा रस्त्याच्या लांबी नुसार आवश्यक रुंदीचा रस्ता उपलब्ध देणेबाबत मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

------

ठराव क्रमांक - १५ विषय क्रमांक- १

दिनांक- - ०८/१०/२०१८

सूचक- मा.हिराबाई (नानी) घुले अनुमोदक – मा.निर्मला गायकवाड

संदर्भ- सौ.भिमाताई पोपट फुगे यांचेकडील दिनांक २९/०८/२०१८ चे पत्र.

भोसरी गावठाण मधील विठ्ठल मंदीराजवळ पुरुषांसाठी सार्वजनिक मुतारी बांधणे बाबतचा विषय प्रभाग समितीच्या मासिक सभेमध्ये मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

------

ठराव क्रमांक - १६ विषय क्रमांक- २

दिनांक- - ०८/१०/२०१८

सूचक- मा.निर्मला गायकवाड अनुमोदक – मा. हिराबाई (नानी) घुले

संदर्भ - नगरसचिव यांचेकडील पत्र क्र.नस/०४/कावि/६२२/२०१८, दिनांक २१/०९/२०१८ चे पत्र.

मा.प्रभाग समिती स्वीकृत सदस्य यांना द्यावयाच्या सुविधांबाबत. नगरसचिव विभागाकडील पत्र क्र.नस/०४/कावि/६२२/२०१८, दि.२१/०९/२०१८ चे पत्र मा.प्रभाग समिती नामनिर्देशीत सदस्य यांना आयडेटीटी कार्ड, व्हिजीटींग कार्ड शिफारस पत्र, लेटरहेड इत्यादी सुविधा उपलब्ध करुन द्यावयाच्या झाल्यास याकामी मा.प्रभाग समिती सभेची मान्यता घेऊन या विभागास सत्वर कळविणेत यावे. जेणेकरुन त्यानुसार मा.विधी समिती

मार्फत मा. महापालिका सभेच्या मान्यतेने धोरण निश्चित करणेकामी पुढील कार्यवाही करणे सोईचे होईल. सदरच्या विषयास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

------

ठराव क्रमांक - १७ विषय क्रमांक- ३

दिनांक- - ०८/१०/२०१८

सूचक- मा.विकास डोळस अनुमोदक – मा.सागर गवळी

संदर्भ - इ क्षेत्रीय कार्यालय, प्रशासन यांचेकडील पत्र क्र. इक्षेका/३/कावि/३९५/२०१८,
दिनांक १८/०९/२०१८ चे पत्र.

दिनांक ७/९/२०१८ रोजीच्या आढावा बैठकीमध्ये मा.आयुक्त सो.यांनी हॉकर्स झोन फेरीवाला उपसमिती स्थापन करणे व फेरीवाला झोन निश्चित करणेबाबत सुचना दिल्या आहेत. त्यानुसार इ क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील निश्चित केलेले फेरीवाला क्षेत्रांची पाहणी दिनांक १४/०९/२०१८ रोजी स्थापन केलेल्या उपसमिती सदस्या समवेत करण्यात येऊन हॉकर्स झोन व नो हॉकर्स झोन याबाबतचे माहिती सोबत जोडण्यात आलेली येत आहे.

## फेरीवाले / पथविक्रेते/हॉकर्सबाबत तपशील

| अ.क्रं | तपशील | आकडेवारी | शेरा |
|---|---|---|---|
| १. | सर्व्हेक्षण झालेले एकुण फेरीवाले/पथविक्रेते/हॉकर्स | १०४९ | |
| २. | पात्र/ फेरीवाले/पथविक्रेते/हॉकर्स | ८८६ | |
| ३. | अपात्र फेरीवाले/पथविक्रेते/हॉकर्स | १६३ | |
| ४. | बायोमेट्रीक नोंदणी पुर्ण झालेले फेरीवाले /पथविक्रेते/हॉकर्स | ६०७ | |
| ५. | प्रमाणपत्र /ओळखपत्र दिलेले फेरीवाले/पथविक्रेते/हॉकर्स | ५१८ | |
| ६. | स्थिर हॉकर्स संख्या | ६८६ | |
| ७. | अस्थिर हॉकर्स संख्या | २०० | |
| | निश्चित केलेला फेरीवाला क्षेत्र | | |

| जुना प्रभाग क्रं | नवीन प्रभाग क्रं | निश्चित फेरीवाला क्षेत्र | हॉकर्स एकुण जागा |
|---|---|---|---|
| ६ मोशी | ३ च-होली मोशी | १.मोशी चौकातील भाजी मंडई हलविण्यासाठी जवळची जागा ( प्रस्तावीत) संख्या – ५० | ४ |
| ७ च-होली | ३ च-होली मोशी | १.च-होली चौक ते च-होली फाटा दफनभुमी ते भुजबळ हॉटेल जवळ संख्या – १०<br>२.च-होली चौक ते काळजेवाडी रस्ता डावी बाजू संख्या – १०<br>२.च-होली चौक ते काळजेवाडी रस्ता उजवी बाजू संख्या – २२ | |
| ३१दिघी | ४दिघी बोपखेल | १.पवळी रस्ता बीयु भंडारी रो हाउस जवळ संख्या- ४९<br>२.सावंत नगर संख्या – २५<br>३.कृष्णानगर रस्ता संख्या – २०<br>४.पवळी रस्ता,बालाजी रेसिडेंसी जवळ डावी बाजू संख्या – २० | ४ |
| ३२ सॅन्डविक कॉलनी | ५ गवळीनगर | १.डॉ बाबासाहेब आंबेडकर उदयान बाहेर संख्या – ४<br>२.संत तुकारामनगर पाण्याच्याटाकी जवळ संख्या- ९ | |

| | | | |
|---|---|---|---|
| ३३ गवळीनगर | ५ गवळीनगर | जागा उपलब्ध नसल्याने फिरता फेरीवाला क्षेत्र | २ |
| ३४ गव्हाणेवस्ती | ७ भोसरी गावठाण | १.गव्हाणे वस्ती भोसरी बॅडमिटन हॉल जवळ संख्या – ५२ | ३ |
| ३५ भोसरी गावठाण | ७ भोसरी गावठाण | १.कै.अकुंशराव लांडगे नाटयगृह ते से.नं १ नाला पर्यत ( उजवी बाजू ) संख्या – १२० <br> २. कै.अकुंशराव लांडगे नाटयगृह ते से.नं १ नाला पर्यत ( डावी बाजू ) संख्या – १२० | |

जावक क्र. इक्षेका/३/कावि /३१४/२०१८. दिनांक -०५/०९/२०१८.

**विषय – हॉकर्स झोन पुर्न:स्थापित करणेसाठी उपसमितीची नियुक्ती करणेबाबत...**

संदर्भ – दिनांक २७/०३/२०१८ रोजीचा शहर फेरीवाला समिती बैठक सभावृत्तात.

**आदेश,**

उपरोक्त विषयान्वये दिनांक २७/०३/२०१८ रोजीच्या शहर फेरीवाला समिती बैठकीमध्ये हॉकर्स झोन पुर्न:स्थापित करणेसाठी उपसमितीची स्थापना करणेबाबत सूचना देणेत आलेल्या आहेत. त्यानुसार समिती स्थापन करताना खालीलप्रमाणे सदस्यांची नेमणूक करण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | सदस्य | नांव |
|---|---|---|
| १ | प्रभाग फेरीवाला उपसमिती अध्यक्ष तथा क्षेत्रीय अधिकारी | श्री.श्रीनिवास रामचंद्र दांगट |
| २ | संबंधित क्षेत्रीय कार्यालयाकडील स्थापत्य विभागाचे कार्यकारी अभियंता | श्री. |
| ३ | उपसंचालक नगररचना यांनी नेमलेला नगररचना विभागाचा प्रतिनिधी | श्री.संदेश खडतरे |
| ४ | वाहतूक शाख्तील पोलीस निरीक्षक | पोलीस इन्सपेक्टर |
| ५ | एफ.डी.ए..प्रतिनिधी | फुड इन्सपेक्टर |
| ६ | मुख्य कार्यालयाचे अतिक्रमण पथकातील सदस्य | श्री.सुरेश रामचंद्र कोंढरे |
| ७ | ३ अशासकीय सदस्य/शहर फेरीवाला सदस्य | १.शोभा शिंदे <br> २. साडेकर किरण श्रीधर <br> ३.शब्बीर महमंद इनामदार |

उपरोक्तप्रमाणे इ प्रभाग फेरीवाला उपसमितीची प्रभाग अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली स्थापन करणेत आलेली आहे.

---------

**दिनांक ८/१०/२०१८ सकाळी ११.०० वा. झाली. सभेत खालीलप्रमाणे मा.नगरसदस्यांनी चर्चा केली.**

**मा.क्षेत्रीय अधिकारी –** मा.आयुक्त यांनी दिनांक २७/०३/२०१८ रोजीच्या शहर फेरीवाला समिती बैठकीमध्ये हॉकर्स झोन पुर्न:स्थापित करणेसाठी उपसमितीची स्थापना करणेबाबत सूचना देणेत आलेल्या आहेत. त्यानुसार प्रभाग फेरीवाला उपसमिती अध्यक्ष तथा क्षेत्रीय अधिकारी - श्री.श्रीनिवास रामचंद्र दांगट, संबंधित क्षेत्रीय कार्यालयाकडील स्थापत्य विभागाचे कार्यकारी अभियंता - , उपसंचालक नगररचना यांनी नेमलेला नगररचना विभागाचा प्रतिनिधी- श्री.संदेश खडतरे, वाहतूक शाखेतील पोलीस निरीक्षक - पोलीस इन्सपेक्टर, एफ.डी.ए.प्रतिनिधी - फुड इन्सपेक्टर, मुख्य कार्यालयाचे अतिक्रमण पथकातील सदस्य - श्री.सुरेश रामचंद्र कोंढरे, अशासकीय सदस्य/शहर फेरीवाला सदस्य -१.शोभा शिंदे २. साडेकर किरण श्रीधर ३.शब्बीर महमंद इनामदार अशा प्रकारची ही फेरीवाला समिती स्थापन झाली आहे. बोपखेलची माहिती काल आलेली आहे.

**मा.सागर गवळी –** इ प्रभागातील हॉकर्स बाबत जे सांगणेत आले. त्यावरुन माझे प्रभागामध्ये हा विषय नकोच. माझे वॉर्डमध्ये सिध्देश्वर शाळा आहे या ठिकाणी वाहतूकीमुळे खूप अडथळा होतो. ब-याचवेळा अपघात होण्याची शक्यता असते. डॉ.आंबेडकरनगर मध्ये सुध्दा वाहतूकीमुळे अडथळा होत असतो. माझे वॉर्डमधील जेवढे हॉकर्स आहे ते मला नको. पार्कींगला हॉकर्स झोन निश्चीत करा. वाहतुकीला अडथळा होणार नाही या ठिकाणी हॉकर्स करण्यास हरकत नाही.

दिघीरोडला शितल दुकान आहे त्या ठिकाणी रोज एवढया गाडया उभ्या राहतात की, तेथे पायी जाणे-येणे करीता जागा नसते. दिघीरोडला संत तुकारामनगर मध्ये अजिबात हॉकर्स नको. मोकळया जागा आहेत त्या ठिकाणी हॉकर्स झोन असावे. शाळेजवळ हॉकर्स झोन निश्चीत करु नका.

**मा.प्रियांका बारसे –** हॉकर्स झोन दोन्हीकडे करा. नाही तर दोन्हीचे करु नका.

**मा.सागर गवळी –** सखुबाई गवळी उद्यानच्या बाजूला हॉकर्स करा. स्थानिक धंदयावाले यांनी काय करायचे. दिघीरोडला ज्या हातगाडया आहेत त्यांचेवर कारवाई करण्यात यावी. रस्त्यावर गाडया लावू नका.

**मा.विकास डोळस –** हॉकर्स झोनसाठी तुम्ही चारही ठिकाणी जागेवर गेला होता का? आम्हाला का नाही बोलावले. आम्हाला काही अधिकार नसतील तर मिटींग घेऊ नका.

**मा.क्षेत्रीय अधिकारी –** सदर उपसमिती पाहणीबाबत सदस्यांना बरोबर घेऊन पाहणी करावे असे आदेश नाही. तरी पण आपले मागणीनुसार पुन्हा व्हीजीट घेऊ. २०१२ मध्ये झालेल्या सर्व्हेनुसार शहर फेरीवाला समितीने पाहणी केली होती त्यावेळी हॉकर्स झोन त्यास प्रभाग समितीने मान्यता दिलेली आहे. इ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत नो हॉकर्स झोन निश्चीत केलेले आहे त्याची यादी वाचून दाखविली.

**मा.सभापती –** हा विषय नामंजूर करण्यात यावा. आमचा या विषयाला विरोध आहे. उपरोक्त प्रमाणे चर्चा करण्यात आली.

-------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभाकामकाजात दाखल करुन घेणेत आले.**

**-------**

ठराव क्रमांक - **१८** विषय क्रमांक- १

दिनांक- - **०८/१०/**२०१८

सूचक- मा.हिराबाई (नानी) घुले अनुमोदक – मा.विकास डोळस

संदर्भ - कै. सदाशिव फुगे मैदान (आखाडा दुरुस्ती) मा.भिमाताई फुगे, सभापती इ प्रभाग यांचे दिनांक ८/१०/२०१८ चे पत्र.

कै. सदाशिव फुगे मैदान (आखाडा दुरुस्ती) १) मैदान पुर्ण बंदीस्त करणे २) गॅलरी वाढविणे ३) आखाडा उचलून घेणे ४) नावाची कमाण बांधणे ५) हॉल बांधणे (स्लॅप टाकणे) विठ्ठल रुक्मीणी मंदीर भोसरी गावठाण संडास बाथरुम बांधणे. वर पाण्याची टाकी बसविणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

**------**

ठराव क्रमांक - **१९** विषय क्रमांक- २

दिनांक- - **०८/१०/**२०१८

सूचक- मा.हिराबाई (नानी) घुले अनुमोदक – मा. विकास डोळस

संदर्भ - छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा बसविणे व परिसर सुशोभिकरण करणेबाबत. सौ.हिराबाई (नानी)गोवर्धन घुले यांचे दिनांक ८/१०/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्रमांक ४ दिघी बोपखेल मधील बोपखेल गावठाण मधील मुख्य चौक असलेला बापुजी बुवा चौक येथे छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा बसविणे व सदर परिसर सुशोभिकरण करणेत यावे. बोपखेल मधील नवीन पिढीला छत्रपती शिवाजी महाराज यांची यशोगाथा माहित होणे आवश्यक आहे. बोपखेल मध्ये महान थोर महापुरुषांची एकही प्रतिकृती अथवा पुतळा नाही. थोर महापुरुषांचा आदर्श नवीन पिढीने घ्यावा त्यासाठी त्यांची प्रतिकृती अथवा पुतळा नजरेसमोर असणे महत्वाचे आहे. सबब बोपखेल गावठाणातील बापुजीबुवा चौक येथे छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा बसविणेस व परिसराचे सुशोभिकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

**------**

ठराव क्रमांक – **२०** विषय क्रमांक- ३

दिनांक- - **०८/१०/**२०१८

सूचक- मा. विकास डोळस अनुमोदक – मा.हिराबाई (नानी) घुले

संदर्भ - मोडकळीस आलेली व अनेक वर्षापासून वापरात नसलेली मुतारी व शौचालय निष्कसित करणेबाबत. मा.विकास हरिश्चंद्र डोळस यांचे दि.८/१०/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र.४ दिघी बोपखेल मधील दिघी म.न.पा.शाळेसमोरील गाव जत्रा मैदानातील एका कोप-यात असलेली F.R.P. मुतारी नादुरुस्त असून मोडकळीस आलेली आहे. तसेच नुकतीच स्थापत्य विभागामार्फत जवळच नवीन मुतारी बांधणेत आलेली आहे. तसेच दिघी स.नं.६६ येथील दफनभुमी मधील स्वच्छतागृह नादुरुस्त असून तेही मोडकळीस

आले आहे. सबब दिघी मधील मोडकळीस आलेले तसेच अनेक वर्षापासून वापरात नसलेली दिघी गावजत्रा मैदानातील F.R.P. मुतारी व दिघी स.नं.६६ दफनभुमी मधील स्वच्छतागृह पाडणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला

------

**मा. अध्यक्ष -** यानंतर मा.अध्यक्षा यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

सही/-
अध्यक्षा
इ प्रभाग समिती
भोसरी – ३९.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
इ क्षेत्रीय कार्यालय, भोसरी – ३९
क्र-इक्षेका/कावि/४/**३०९** /२०१८
दिनांक- **२४/१०**/२०१८.

सही/-
प्रशासन अधिकारी तथा सचिव
इ क्षेत्रीय कार्यालय
भोसरी – ३९.

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
सभावृत्तांतील ठरावानुसार आपले विभागाशी संबंधित विषयाबाबत योग्य ती नियमाधिन कार्यवाही करणेत यावी. याबाबत वेगळा पत्रव्यवहार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

-------

**दिनांक- ७/९/२०१८ व ०५/१०/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता ची तहकुब सभा सोमवार दिनांक ८/१०/२०१८ सकाळी ११.०० वा. झाली. सभेत खालीलप्रमाणे मा.नगरसदस्यांनी चर्चा केली.**

**मा.विकास डोळस -** अतिक्रमण विभाग हा समजूत काढण्याचा प्रयत्न करीत आहे. आम्ही फोन करीत असतो परंतू काहीही उत्तर देत नाहीत. आमचेकडे अतिक्रमणची टीम पुर्वी होती ती तशीच राहू दया. सेंट्रल लाईन का करणेत आले आहे. ममता चौक येथे कधीच कारवाई होत नाही.

**श्री.सुरेश कोंढरे- अतिक्रमण निरीक्षक-** इ प्रभाग आता माझेकडे आलेला आहे. त्यामुळे ममता चौक मला माहित नाही.

**मा. विकास डोळस –** विसर्जन कुंडया बाबत आपण व्हिजीट करायला पाहिजे होती. सध्या स्थापत्य विषयक तक्रार नाही. ५००/६०० गणेशमुर्त्यांचे विसर्जन करयासाठी मी २५/३० लोक कामाला लावली होती.

**मा.सागर गवळी –** पुढच्या वेळेस मिटींगला नगररचना व बांधकाम परवानगी विभागाचे कर्मचारी आले पाहिजे. स्थापत्य विभागाने काय नियोजन केले आहे. शिवेसमोरचा रस्ता आहे. त्याच कमानीपासून जवळच पाच सहा घरे आहे. त्यांना मोबदला दि ला पा हि जे.

**श्रीम.शिनकर प्रेरणा – (उपअभियंता स्थापत्य)** नगररचना विभागाने पार्कींग करुन घेतले होते.

**मा.सागर गवळी -** रामभाऊ गबाजी गवळी कमान केली पाहिजे.

**श्री.निखील फेंडर (कनिष्ठ अभियंता स्थापत्य उद्यान) –** प्रभागातून काम होणार आहे का याबाबत चौकशी करुन घेतो. त्यानंतर आम्ही आमचे विभागाकडून काम करुन घेऊ .

**मा.सागर गवळी –** खंडोबा माळचे काम थांबवले आहे. ते काम का करीत नाही.

**मा.सभापती –** तुम्ही त्यांना नोटीस दया. व काम करुन घ्या.

**मा.सागर गवळी** – सगळे लेबर घेऊन लगेच काम सुरु करुन घेऊ.

**मा.सभापती** – सँडविक कॉलनीमध्ये अजिबात पाणीपुरवठा होत नाही. आठ दिवस झाले फोन केले नाही. पाण्याची फार बिकट परिस्थिती आहे.

**श्री.वहिकर – (उपअभियंता पाणीपुरवठा विभाग**) - या आठवडयात पाणीपुरवठा सुरळीत होणेबाबतचे काम करुन घेतो.

**मा.प्रियांका बारसे –** सर्व कामाची यादी अपणाकडे आहे. सर्व अधिकारी/कर्मचारी यांचे मी आभार मानते. १५ ऑक्टोबर पासून कामे सुरु करणार आहे. सर्व कामकाज पुर्ण करण्यासाठी सर्वांनी तत्पर राहिले पाहिजे.

**श्री.लांडे पी.बी.(उपअभियंता विद्युत)** – निविदा प्रसिध्द केलेली आहे. त्यामुळे लवकरच कामे पुर्ण होतील.

**मा.निर्मला गायकवाड –** दिघी येथील मोडकळीस आलेली पाण्याची टाकी काढणेबाबतचा विषय सहा महिन्यापुर्वी मंजूर झालेला असून सुध्दा पाण्याची टाकी अजून पाडण्यात आलेली नाही. त्या विषयाचे काय झाले? तात्काळ कार्यवाही करा.

**मा.क्षेत्रीय अधिकारी –** प्रत्येक महिन्याच्या प्रभाग समितीच्या मासिक सभेची कार्यपत्रिका व सभावृत्तांत सर्व विभागांना देण्यात येतो. ठराव मंजूर झालेनंतर संबंधीत विभागाची कामकाज करणेबाबतची जबाबदारी असते.

**मा.प्रियांका बारसे –** बॅडमिंटनच्या नावाचा ठराव मंजूर झालेला आहे. परंतू अजून ते काम झालेले नाही.

**मा.सागर गवळी** – महादेवनगर येथील आठ/दहा दिवसापासून पाण्याचे नियोजन बिघडलेले आहे. कोणत्या प्रभागाला किती पाणी आहे ते आम्हाला सांगण्यात यावे. पाण्याचे नियोजन बिघडले तर काय करायचे आहे हे समजून घ्यावे. नागरीक एक/दोन दिवस सहकार्य करतील नंतर कोणीही काहीही करु शकत नाही. टँकरची यंत्रणा वाढविण्यात यावी.

**मा.निर्मला गायकवाड** – दिघीमध्ये पाण्याचा खूप त्रास आहे. दिघीला पाणी वेळेवर व प्रेशरने २४ तास देण्यात यावे.

**मा.सभापती** – दिघीरोडला कच-याचे ढीग तसेच पडलेले आहे. दिघी रोड व सँडविक कॉलनी येथे कच-याची गाडी  येत नाही.  विरुंगळा केंद्राजवळ रस्त्यावर कचरा आलेला आहे. या सर्व ठिकाणी लक्ष देणे गरजेचे आहे. कच-याचे ढीग नुसतेच लावलेले असतात. ते उचलले पाहिजे. साफ सफाई करणा-या कर्मचा-यांना हॅण्डग्लोज देण्यात यावे.

**मा.निर्मला गायकवाड** – दिघी येथील गल्लीबोळातील कचरा उचलला जात नाही.तो कचरा तसाच पडलेला असतो.

**मा.सभापती** – J.C.B. लावून काम करुन घ्या. सगळीकडील कच-यांचे उचलण्यात यावे.

**मा.विकास डोळस** – श्री.गणबोटे,ढोकळे,डामसे यांना फोन/मॅसेज केला की कामकाज करण्यास ते लगेच हजर असतात. त्यामुळे त्यांचे या ठिकाणी कौतुक करण्यात येत आहे.

**मा.सभापती** - यानंतर मा.अध्यक्षा यांनी सर्वांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

-------